## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८७ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०२/२०१७

**१) संगनमत करुन ०६ ब्रास अवैध रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/२/२०१७ चे ०४.०० ते ०४.३० वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपी ट्रक चालकाने आपल्या मालका सोबत संगनमत करुन रेती चेक पोस्ट पवनी येथुन आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन ट्रक मध्ये ०६ ब्रास रेती किंमती १२,०००/—रु. ची अवैधरित्या रेती चोरीने चोरुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) शेतातील पोतळी मधुन तुळ डाळ चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/२/२०१७ चे २३.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे मालकीचे किटाडी शेत शिवारातील शेत बांधीत १ पोतळी मध्ये ठेवलेली २० किलो तुळ डाळ किंमती १२००/—रु. चा माल चोरुन नेत असतांना फिर्यादीस दिसल्याने त्याचा पाठलाग करुन आरोपीने माल शेतबांधीमध्ये ठेवुन पळुन गेला आरोपीने फिर्यादीचे शेतबांधी मधुन १ पोतळी मधुन २० किलो तुळ डाळ चोरुन नेण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी राजकुमार दुर्योधन शिवनकर वय २५ वर्ष, रा. किटाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९,५११ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन शेतातुन तुळ दाळ चोरुन नेल्याच्या याकारणावरुन कुऱ्हाडीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/२/२०१७ चे २३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी जिवन लक्ष्मण मल्हारी वय ४० वर्ष, रा. किटाडी हा आपल्या घरी झोपला असतांना यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन हातात काठया, कुऱ्हाळ घेवुन फिर्यादीचे घरी अंगणात जावुन दरवाजा ठोकले असता फिर्यादी हा बाहेर आल्यावर त्यास तु आमच्या शेतातुन तुळ चोरुन आनलास असे म्हणुन आरोपी क्र. १ ने कुऱ्हाळीने मारुन जखमी केले व आरोपी क्र. २,३ यांनी काठीने फिर्यादीच्या उजव्या हातावर, डोक्यावर उजवे बाजुला मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन मुलींना जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/२/२०१७ चे ०८.०० ते ०८.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. बबीता रोषन कनोजे वय ३४ वर्ष, रा. भगतसिंग वार्ड नविन टाकळी भंडारा यांच्या मुली जखमी कु. मोनाली रोषन कनोजे वय १० वर्ष रा. ८ वर्ष, हया सायकलने शाळेत जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने लापरवाहीने, हयगयीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मुलीच्या सायकलला धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साकोरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध देशी दारू/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०४/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, साकोली, लाखांदुर, व जवाहरनगर येथील अवैध देशी दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ०४ लिटर १४० मिली लिटर देशी दारु+ नगदी १२० किंमती १३३०/—रू तसेच जुगारातुन ३७४५/—रु. असा एकुण किंमती ५,०७५/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म. रा.)

psc
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.